www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

Language Code : **11**

इस पुस्तिका में **20** मुद्रित पृष्ठ हैं।
This booklet contains **20** Printed pages.

# SAS-24-I

**प्रश्न-पत्र-I / PAPER-I**
**मराठी भाषा परिशिष्ट**
**Marathi Language Supplement**
**भाग-IV & V / PART-IV & V**

मुख्य परीक्षा पुस्तिका संख्या / Main Test Booklet No.

मुख्य परीक्षा पुस्तिका कोड / Main Test Booklet Code
**J**

**इस परीक्षा पुस्तिका को तब तक न खोलें जब तक कहा न जाए।**
**Do not open this Test Booklet until you are asked to do so.**
**इस परीक्षा पुस्तिका के पिछले आवरण (पृष्ठ 19 व 20) पर दिए निर्देशों को ध्यान से पढ़ें।**
**Read carefully the Instructions on the Back Cover (Page 19 & 20) of this Test Booklet.**

**मराठी में निर्देशों के लिए इस पुस्तिका का पृष्ठ 2 देखें। / FOR INSTRUCTIONS IN MARATHI SEE PAGE 2 OF THIS BOOKLET.**

## परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. यह पुस्तिका मुख्य परीक्षा पुस्तिका की एक परिशिष्ट है, उन परीक्षार्थियों के लिए जो **या** तो भाग IV (भाषा I) **या** भाग V (भाषा II) **मराठी** भाषा में देना चाहते हैं, लेकिन **दोनों नहीं**।
2. परीक्षार्थी भाग I एवं भाग II **या** III के उत्तर मुख्य परीक्षा पुस्तिका से दें और भाग IV व V के उत्तर उनके द्वारा चुनी भाषाओं से।
3. अंग्रेज़ी व हिन्दी भाषा पर प्रश्न मुख्य परीक्षा पुस्तिका में भाग IV व भाग V के अन्तर्गत दिए गए हैं। भाषा परिशिष्टों को आप अलग से माँग सकते हैं।
4. इस पृष्ठ पर विवरण अंकित करने एवं उत्तर पत्र पर निशान लगाने के लिए **केवल काले/नीले बॉल पॉइंट पेन** का प्रयोग करें।
5. इस भाषा पुस्तिका का **संकेत** है **J**। यह सुनिश्चित कर लें कि इस भाषा परिशिष्ट पुस्तिका का संकेत, उत्तर पत्र के **पृष्ठ-2** एवं मुख्य परीक्षा पुस्तिका पर छपे संकेत से मिलता है। अगर यह भिन्न हो, तो परीक्षार्थी दूसरी भाषा परिशिष्ट परीक्षा पुस्तिका लेने के लिए निरीक्षक को तुरन्त अवगत कराएँ।
6. इस परीक्षा पुस्तिका में **दो** भाग IV और V हैं, जिनमें **60** वस्तुनिष्ठ प्रश्न हैं, जो प्रत्येक 1 अंक का है :
   भाग-IV : भाषा-I (मराठी) (प्र. 91 से प्र. 120)
   भाग-V : भाषा-II (मराठी) (प्र. 121 से प्र. 150)
7. भाग-IV में भाषा-I के लिए 30 प्रश्न और भाग-V में भाषा-II के लिए 30 प्रश्न दिए गए हैं। इस परीक्षा पुस्तिका में केवल मराठी भाषा से संबंधित प्रश्न दिए गए हैं। **यदि भाषा-I और/या भाषा-II में आपके द्वारा चुनी गई भाषा(एँ) मराठी के अलावा है तो कृपया उस भाषा वाली परीक्षा पुस्तिका माँग लीजिए। जिन भाषाओं के प्रश्नों के उत्तर आप दे रहे हैं वह आवेदन पत्र में चुनी गई भाषाओं से अवश्य मेल खानी चाहिए।**
8. **परीक्षार्थी भाग-V (भाषा-II) के लिए, भाषा सूची से ऐसी भाषा चुनें जो उनके द्वारा भाषा-I (भाग-IV) में चुनी गई भाषा से भिन्न हो।**
9. रफ कार्य परीक्षा पुस्तिका में इस प्रयोजन के लिए दी गई खाली जगह पर ही करें।
10. सभी उत्तर केवल OMR उत्तर पत्र पर ही अंकित करें। अपने उत्तर ध्यानपूर्वक अंकित करें। उत्तर बदलने हेतु श्वेत रंजक का प्रयोग निषिद्ध है।

## INSTRUCTIONS FOR CANDIDATES

1. This booklet is a supplement to the Main Test Booklet for those candidates who wish to answer **EITHER** Part IV (Language I) **OR** Part V (Language II) in **MARATHI** language, but **NOT BOTH**.
2. Candidates are required to answer Part I and Part II **OR** III from the Main Test Booklet and Parts IV and V from the languages chosen by them.
3. Questions on English and Hindi languages for Part IV and Part V have been given in the Main Test Booklet. Language Supplements can be asked for separately.
4. Use **Black/Blue Ball Point Pen only** for writing particulars on this page/ marking responses in the Answer Sheet.
5. The CODE for this Language Booklet is **J**. Make sure that the CODE printed on **Side-2** of the Answer Sheet and on your Main Test Booklet is the same as that on this Language Supplement Test Booklet. In case of discrepancy, the candidate should immediately report the matter to the Invigilator for replacement of the Language Supplement Test Booklet.
6. This Test Booklet has **two** Parts, IV and V, consisting of **60** Objective Type Questions, each carrying 1 mark :
   Part-IV : Language-I (Marathi) (Q. 91 to Q. 120)
   Part-V : Language-II (Marathi) (Q. 121 to Q. 150)
7. Part-IV contains 30 questions for Language-I and Part-V contains 30 questions for Language-II. In this Test Booklet, only questions pertaining to Marathi language have been given. **In case the language/s you have opted for as Language-I and/or Language-II is a Language other than Marathi, please ask for a Test Booklet that contains questions on that language. The language being answered must tally with the languages opted for in your Application Form.**
8. **Candidates are required to attempt questions in Part-V (Language-II) in a language other than the one chosen as Language-I (in Part-IV) from the list of languages.**
9. Rough work should be done only in the space provided in the Test Booklet for the same.
10. The answers are to be recorded on the OMR Answer Sheet only. Mark your responses carefully. No whitener is allowed for changing answers.

परीक्षार्थी का नाम (बड़े अक्षरों में) : ____________________
Name of the Candidate (in Capitals) :

अनुक्रमांक : (अंकों में) / Roll Number : in figures ____________________
: शब्दों में / in words ____________________

परीक्षा केन्द्र (बड़े अक्षरों में) : ____________________
Centre of Examination (in Capitals) :

परीक्षार्थी के हस्ताक्षर : ____________________ निरीक्षक के हस्ताक्षर : ____________________
Candidate's Signature : Invigilator's Signature :

Facsimile Signature Stamp of
Centre Superintendent : ____________________

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

Language Code : **11**

ही पुस्तिका **20** पृष्ठ आहे.

# SAS-24-I

**प्रश्नपत्रिका-I**

**मराठी भाषा पुरवणी**

**भाग IV आणि V**

**चाचणी पुस्तिका कोड**

**J**

**ही पुस्तिका उघडायला सांगेपर्यंत ती उघडू नका.**

**या पुस्तिकेच्या मलपृष्ठावरील ( 19 आणि 20 ) सूचना काळजीपूर्वक वाचा.**

**परीक्षार्थींसाठी सूचना :**

1. ही पुस्तिका मुख्य चाचणी पुस्तिकेची पुरवणी असून ती अशा परीक्षार्थींकरिता आहे, जे **मराठी** भाषेतील भाग IV (भाषा I) **किंवा** भाग V (भाषा II) **यांपैकी एकाची** उत्तरे लिहू इच्छितात, **दोन्हींची नव्हे.**
2. परीक्षार्थींनी मुख्य चाचणी पुस्तिकेतील भाग I आणि भाग II **किंवा** III सोडवायचा आहे आणि त्यांनी निवडलेल्या भाषेतील भाग IV आणि V सोडवायचा आहे.
3. भाग IV आणि V यांमधील इंग्लिश आणि हिन्दी भाषांवरील प्रश्न मुख्य चाचणी पुस्तिकेत दिलेले आहेत. पुरवण्या स्वतंत्रपणे मागून घेता येतील.
4. या पृष्ठावर माहिती लिहिण्यासाठी/प्रतिक्रिया नोंदवण्यासाठी **केवळ काळे / निळे बॉल पॉइंट पेनच** वापरा.
5. या भाषा पुस्तिकेचे **कोड J** आहे. उत्तर पत्रिकेच्या **बाजू- 2** वर छापलेले कोड आणि या भाषा पुरवणी पुस्तिकेवरील कोड एकच आहे, याची खात्री करून घ्या. जर काही विसंगती असेल तर परीक्षार्थीने ती ताबडतोब पर्यवेक्षकास दाखवावी आणि भाषा पुरवणी पुस्तिका बदलून मागावी.
6. या चाचणी पुस्तिकेत IV आणि V असे **दोन** भाग आहेत. त्यांमध्ये 60 वस्तुनिष्ठ पद्धतीचे प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास एक गुण आहे.

   **भाग-IV : भाषा-I ( मराठी )** *(प्र. 91 ते प्र. 120)*

   **भाग-V : भाषा-II ( मराठी )** *(प्र. 121 ते प्र. 150)*
7. **भाग-IV** मध्ये भाषा-I साठी 30 प्रश्न आहेत आणि भाग-V मध्ये भाषा-II साठी 30 प्रश्न आहेत. या चाचणी पुस्तिकेत केवळ मराठी भाषेशी संबंधित प्रश्न दिलेले आहेत. **जर तुम्ही भाषा-I व/वा भाषा-II साठी निवडलेली भाषा पेक्षा मराठी वेगळी असेल, तर कृपया त्या भाषेवरील प्रश्न असलेल्या चाचणी पुस्तिकेची मागणी करा. ज्या भाषेची उत्तरे तुम्ही लिहीत आहात ती भाषा आणि तुमच्या अर्जामध्ये निवडलेली भाषा या एकच असल्या पाहिजेत.**
8. **भाग-V ( भाषा-II ) याकरिता असलेली भाषा ही भाषांच्या यादीमधील निवडलेली भाषा-I (IV भागातील) पेक्षा निराळी असली पाहिजे.**
9. चाचणी पुस्तिकेमध्ये कच्चा आराखडा करण्यासाठी नेमून दिलेल्या जागेतच तो करावा.
10. OMR उत्तर पृष्ठावरच उत्तरे नोंदवायची आहेत. तुमच्या प्रतिक्रिया काळजीपूर्वक नोंदवा. उत्तरात बदल करण्यासाठी पांढरा रंग (whitener) वापरण्याची परवानगी नाही.

परीक्षार्थीचे नाव : ______________________

अनुक्रमांक : अंकांमध्ये : ______________________

: शब्दांमध्ये : ______________________

परीक्षाकेंद्र : ______________________

परीक्षार्थीची सही : ______________ पर्यवेक्षकाची सही : ______________

Facsimile signature stamp of
Centre Superintendent ______________________

परीक्षार्थींनी **भाषा-I** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग-IV** मधील ( **प्रश्न क्र. 91** ते **120** ) यांची उत्तरे द्यावीत.

Candidates should attempt the questions from **Part-IV (Q.No. 91-120)**, if they have opted **MARATHI** as **Language-I** only.

→

# भाग–IV

# भाषा–I

# मराठी

**महत्त्वपूर्ण :** परीक्षार्थींनी भाषा – **I** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग – IV** मधील **( प्रश्न क्र. 91 ते 120 )** यांची उत्तरे द्यावीत.

**सूचना : पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक 91 ते 99 यासाठी योग्य पर्यायाची निवड करा.**

आजकाल मुलांचा बराचसा वेळ इंटरनेटवर आणि समाजमाध्यमांवरच व्यतीत होत आहे. आपल्यासमोर ही एक मोठीच समस्या होऊन बसली आहे. सतत कुणा ना कुणाशी आभासी देवाण–घेवाण करत राहणं हेच जगणं होऊन गेलंय. दुचाकीवरून जाताना, कार चालवताना, अगदी रस्त्यावरून चालत जातानाही मुलं मोबाईल बघतच असतात. तत्पर प्रतिसाद आणि अविरत संवादसुख लाभलं नाही तर त्यांच्या जिवाची तगमग होते. पाण्याबाहेर काढलेले मासेच जणू! समाजमाध्यमांवर चालू राहणाऱ्या या अखंड आंतरक्रियांमुळे प्रत्येकाची चिंतन आणि मनन करण्याची सवय मोडू लागली आहे. विद्यार्थी प्रामुख्यानं आता केवळ प्रतिक्रिया देऊ लागलेत. अशी प्रतिक्रियासज्जता महत्त्वाच्या बाबींवर तडकाफडकी निर्णय घ्यायला उपयोगी पडते खरी; परंतु त्यामागं सखोल विचार नसल्यानं त्यातून अखेरीस भय आणि चिंताच वाट्याला येते.

शाळेत मुलांना चांगली चांगली रंजक पुस्तकं वाचायला लावली पाहिजेत. त्यासाठी शाळेच्या वाचनालयात अशी पुस्तकं उपलब्ध करून द्यायला हवीत. शालेय कामकाजाच्या कालावधीत मोबाईल फोनच्या वापराला सक्त मनाई करायला हवी. शाळेत रोजच्या रोज काही काळ नियमित वाचन केल्यामुळे मुलांना हळूहळू वाचनाचा छंद लागू शकेल. खरं म्हणजे, अशी कथात्म पुस्तकं वाचत असताना बऱ्याचदा एक चित्रपटच आपल्या मनात सुरू होतो. वाचन हा मुलांची एकाग्रता वाढवण्याचा आणि त्यांची वैचारिक क्षमता प्रबळ करण्याचा सर्वोत्तम उपाय होय. अनेक मुलं इंटरनेटवर पुस्तकं वाचतात; परंतु असं वाचन डोळ्यांच्या आरोग्यासाठी चांगलं नसतं आणि त्यातून चिंतनप्रक्रियेलाही फारशी चालना मिळत नाही. आपण वाचत असताना आपलं लक्ष विचलित करणाऱ्या इतरही बऱ्याच गोष्टी इंटरनेटवर येत राहतात. एकाग्रचित्तानं करावयाच्या वाचनात अशा गोष्टी व्यत्यय आणतात. खरंखुरं पुस्तक वाचताना आपण विनाव्यत्यय सलग वाचू शकतो. म्हणून प्रत्यक्ष पुस्तक वाचण्यालाच प्रोत्साहन द्यायला हवं. शिवाय स्मार्ट फोन, वैयक्तिक संगणक, टीव्ही या प्रकारची सगळीच दृश्य उपकरणं विशिष्ट किरण उत्सर्जित करतात हे आपण पाहतोच.

माझ्या लहानपणी मला मिळालेल्या सर्वोत्तम भेटवस्तू म्हणजे पुस्तकंच. महात्मा गांधी यांचं आत्मचरित्र, पंचतंत्र, महाभारत, जातककथा इत्यादींचा माझ्यावर खूपच प्रभाव पडला होता. जोडीला 'चांदोबा' चा हिंदी अवतार असलेलं 'चंदामामा' हे मासिकही मी नियमित वाचत असे. ते अतिशय उत्तम मासिक असायचं. त्यात भारतीय पुराणकथा असत. याशिवाय, भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या रोमहर्षक कथांनीही मी मंत्रमुग्ध व्हायचो. पुस्तकवाचनाचा नाद एकदा का लागला की आयुष्यभर तो तुमची पाठ सोडत नाही. वाचनाची गोडी काही झटपट लागत नसते. मुलांना पुस्तकवाचनाचा छंद लागावा यासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याची गरज आहे. त्यामुळे प्रत्येक प्रसंगी, प्रत्येक संधी साधत भेट म्हणून आपण मुलांना पुस्तकं द्यायला हवीत. भारताचं भवितव्य घडवायचं तर या देशाच्या महान तात्त्विक परंपरांची जाण असलेले बहुश्रुत नागरिक आपण घडवायला हवेत. मुलांना चांगली चांगली पुस्तकं वाचण्याची गोडी लावूनच हे साध्य करता येईल. मुलांना वाचनाची गोडी लावणं हा त्यांना चिंतनशील बनवण्याचा एक उत्तम उपाय होय. पुस्तकांच्या वाचनामुळे मुलांचे विचार आणि कल्पना सुस्पष्ट होतात आणि त्यांना चिंतनाची सवय लागते. पुस्तकं, विशेषत: गोष्टींची पुस्तकं वाचल्यानं वाचकाची कल्पनाशक्ती विकसित होते.

**91.** आपण कोणती गोष्ट भेट म्हणून द्यायला हवी असे लेखक सुचवतो ?

(1) टी.व्ही. (2) इंटरनेट (3) पुस्तक (4) स्मार्टफोन

**92.** प्रतिक्रिया सज्जता केव्हा उपयोगी पडते, असे लेखकाला वाटते ?

(1) चित्रपट पाहताना (2) त्वरित निर्णय घेताना

(3) दुचाकी चालवताना (4) पुस्तक वाचताना

**93.** मुलांच्या मोबाईल बघण्याविषयी लेखकाने न सांगितलेला तपशील शोधा.

(1) कार चालवताना (2) रस्त्यावरून चालताना

(3) झोपताना (4) दुचाकीवरून जाताना

**94.** 'अनेक मुलं इंटरनेटवर पुस्तकं वाचतात' या वाक्यातील कर्म शोधा.

(1) मुलं (2) पुस्तकं (3) वाचतात (4) अनेक

**95.** पुढीलपैकी विशेषनाम नसलेला पर्याय शोधा.

(1) पुस्तक (2) पंचतंत्र (3) महाभारत (4) चांदोबा

**96.** विचारशून्य प्रतिक्रिया दिल्याने कोणती गोष्ट वाट्याला येते ?

(1) भय आणि चिंता (2) विनाव्यत्यय वाचन

(3) वाचनाचा छंद (4) कल्पकता

**97.** मुलांची वैचारिक क्षमता वाढविण्याचा कोणता मार्ग लेखकाने सुचवला आहे ?

(1) मोबाईल पाहणे (2) रस्त्यावरून चालणे

(3) चांदोबा पाहणे (4) वाचन

**98.** लेखकाच्या मते कोणती कृती विनाव्यत्यय करता येते ?

(1) वैयक्तिक संगणक (2) आभासी देवाण-घेवाण

(3) समाज माध्यमांवरची अभिव्यक्ती (4) सलग वाचन

**99.** 'कासावीस होणे', 'व्याकूळ होणे' यांचा समानार्थी शब्द शोधा.

(1) सज्जता (2) तगमग (3) रोमहर्ष (4) उत्सर्जन

Prepp
Your Personal Exams Guide

**सूचना : पुढील कविता वाचा आणि प्रश्न क्रमांक 100 ते 105 यासाठी योग्य पर्यायाची निवड करा.**

मी जाईन उडूनी
असाच नकळत जेव्हा
पंखांची फडफड
थिजून जाईल तेव्हा

मज हसणारे मग
उगीच तेव्हा रडती
कुणी आक्रंदती अन्
कुणी मनी हळहळती

कुणी सावरताना
अपुल्याच मनाला सांगे
हे असेच असती
बघ नियतीचे धागे

मग होईल क्षणभर
शांत शांत हे सारे
आणिक क्षणातच
पुन्हा वाहतील वारे

**100.** 'मज हसणारे मग उगीच तेव्हा रडती' यातून कवीने कोणता भाव व्यक्त केला आहे ?
(1) ओरडणे (2) उपहास (3) हळहळ (4) दु:ख

**101.** '<u>थिजून जाईल</u> तेव्हा' मधील अधोरेखित काय आहे ?
(1) गौण क्रियापद (2) प्रायोजक क्रियापद
(3) शक्य क्रियापद (4) संयुक्त क्रियापद

**102.** 'नियती' या शब्दाचा भावार्थ प्रगट न करणारा शब्द शोधा.
(1) प्रारब्ध (2) नशिब (3) ईश्वर (4) दैव

**103.** प्रस्तुत कवितेत कवीने कशाचे चित्रण केले आहे ?
(1) पक्षांची फडफड (2) आयुष्य सावरणे
(3) आयुष्यातील हळहळ (4) मृत्यूनंतरची परिस्थिती

**104.** 'पंखांची फडफड थिजून जाईल' या ओळीच्या अर्थाशी साधर्म्य नसलेले वाक्य ओळखा.

(1) आयुष्य गोठून जाणे (2) कुणीतरी हळहळणे

(3) पक्ष्यांची धडपड थांबणे (4) आयुष्य निश्चल होणे

**105.** 'पुन्हा वाहतील वारे' यातून कवीला काय सुचवायचे आहे ?

(1) परिवर्तन (2) नियती (3) क्षणाचे महत्त्व (4) शांतता

**106.** पुढील वाक्याच्या संदर्भात कोणते विधान योग्य **नाही** आहे ?

'कविता, गाणी आणि समूहगीते मुलांसाठी........'

(1) शब्द आणि वाक्यरचना पाठ करणे आहे

(2) उच्चारण सराव आहे

(3) अभिव्यक्ती उन्नत करणे आणि गेय वाक्ये आहे

(4) विस्तारित शब्दसंग्रह आहे

**107.** पुढीलपैकी कोणती पद्धत विद्यार्थ्याला वर्गात त्याची मूळ भाषा वापरण्यास उत्तेजन देत **नाही** ?

(1) संज्ञापनात्मक पद्धती

(2) थेट पद्धती

(3) श्रव्यभाषिक पद्धती (Audiolingual method)

(4) नैसर्गिक पद्धती

**108.** प्राथमिक पातळीवर ग्रंथालयाचा वापर याबाबत कोणते विधान योग्य **नाही** ?

ग्रंथालय म्हणजे निव्वळ पुस्तकं ठेवण्याची जागा नसून.....

(1) पुस्तकांसोबत गुंतवणूक होण्यासाठी सक्रिय वातावरण असावे.

(2) शिक्षकांनी आणि वरिष्ठांनी वाचनाचा आदर्श प्रस्तुत करावा.

(3) मोठ्याने वाचणे हे फक्त ग्रंथालयातच शक्य असते.

(4) विद्यार्थ्यांना बाल साहित्यातील विविध प्रकार उपलब्ध करून दिले पाहिजे.

**109.** अक्षर आणि ध्वनी यांच्या सहसंबंधावर भर देणारी साक्षरता शिक्षण पद्धती म्हणजे .......

(1) व्याकरण भाषांतर

(2) परिस्थितीनुरुप पद्धती

(3) स्वनिमिक सूचना (Phonic instruction)

(4) समग्रभाषा पद्धती

**110.** पाचवी इयत्तेचा विद्यार्थी म्हणतो, ''माझे काम शिक्षिकेला देण्यापूर्वी मी ते एकदा नीट पाहतो.'' विद्यार्थी कोणत्या लेखन पातळीवर आहे ?

(1) आराखड्याचे पुनर्लेखन (2) मुद्रित शोधन

(3) सवंगड्याकडून मूल्यमापन (4) आराखडा

**111.** तिसऱ्या इयत्तेच्या शिक्षिकेला वर्गात वाचन कट्टा सुरू करायची इच्छा आहे. यासाठी पुस्तकांची निवड करताना पुढीलपैकी कोणते प्रश्न प्रामुख्याने विचारात घेतले पाहिजे ?

(1) पुस्तके स्वायत्तपणे बहुतांश विद्यार्थ्यांची पातळी विचारात घेऊन लिहिली गेली आहेत ?

(2) पुस्तके तिसऱ्या इयत्तेच्या अभ्यासक्रमाच्या उद्दिष्टांची पूर्तता करतील ?

(3) पुस्तके एकापेक्षा अधिक मार्गदर्शक संदर्भासाठी उपयुक्त ठरतील ?

(4) पुस्तकांचे लेखक प्रथितयश आणि आदरणीय बालसाहित्य लेखक आहेत ?

**112.** विद्यार्थ्याला 'वास्तव परिस्थितीत भाषा वापरणे' या त्याच्या उद्‌दिष्टापर्यंत कोणती बाब घेऊन जाते ?

(1) संज्ञापनात्मक पद्धती

(2) थेट पद्धती

(3) श्रव्यभाषिक पद्धती (Audiolingual Method)

(4) नैसर्गिक पद्धती

**113.** इयत्ता तिसरीची शिक्षिका मुलांना आपल्या मित्राला 'शकतो' या त्याच्या क्षमतेवर पाच प्रश्न विचारायला सांगते. उदाहरण – 'तू गाऊ शकतो ?' हा उपक्रम __________ यासाठी आहे.

(1) नियंत्रित मौखिक सराव (2) मुक्त संभाषण

(3) सुप्त श्रवण (4) मौखिक ओघ सराव

**114.** प्रभावीपणे व्याकरणाचे अध्यापन या संदर्भात पुढीलपैकी कोणते विधान योग्य **नाही** ?

(1) व्याकरणाचे नेमके नियम जाणणे (2) संभाषणात सराव करून घेणे

(3) पाठांतरातून व्याकरणाचे नियम पाठ करणे (4) प्रामाणिक संभाषण सादर करणे

**115.** इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षिका वेगवेगळ्या प्रकारची अध्ययन–अध्यापन सामग्री (TLM) एकत्र करु इच्छिते. अध्ययन–अध्यापन सामग्री (TLM) एकत्र करण्यासाठी पुढीलपैकी कोणती बाब योग्य **नाही** ?

(1) सामग्री अशी असावी की ज्यातून विद्यार्थ्यांना शोधताना, हाताळताना कुतूहल वाटणारी असावी.

(2) सामग्री स्थानीय पातळीवर निर्माण झालेली आणि स्थानीय पातळीवर उपलब्ध असावी म्हणजे सहजपणे बदलता येते.

(3) सामग्री विद्यार्थ्यांनीच तयार केलेली असावी नि त्यात गुळगुळीतपणा नसावा. खरखरीत असावी.

(4) या वयोगटाला ती सामग्री सुरक्षित आणि आकर्षक असली पाहिजे.

Prepp
Your Personal Exams Guide

**116.** शिक्षिका मुलांना त्याचे वर्कबुक एकमेकांसोबत बदलून घ्यायला आणि त्याचे काम तपासायला सांगते. या उपक्रमाचे उद्दिष्ट .......

(1) नवीन शब्दसंग्रहाचा सराव करणे

(2) संरचनेचा नियंत्रित सराव करणे

(3) सवंगड्याचे काम तपासण्याचे कौशल्य विकसित करणे

(4) विस्तृत वाचनाचा सराव करणे

**117.** अगदी सुरुवातीच्या अवस्थेतील मुले शिक्षणात चांगल्या प्रकारे गुंततात जेव्हा ........

(1) ते एकापेक्षा अधिक संवेदनांचा आणि हातांचा वापर करतात.

(2) ते सतत त्यांच्या वहीत अक्षरे लिहितात किंवा ट्रेस करतात.

(3) फक्त गतिबोधन कौशल्य आत्मसात करण्यावर भर असतो.

(4) ते शिक्षिकेपाठोपाठ गाणी म्हणतात

**118.** आधारभूत पातळीसाठी पाठ्यपुस्तक तयार करताना पुढीलपैकी कोणते सिद्धांत उपयुक्त **नाही** ?

(1) सादरीकरण सिद्धांत (2) मूर्त सिद्धांत

(3) तंत्रज्ञान सिद्धांत (4) अभ्यासक्रम सिद्धांत

**119.** राष्ट्रीय शैक्षणिक आराखडा (NCF) च्या धोरणानुसार कौशल्ये आत्मसात करण्यासाठी प्रत्येक मुलाला आनंददायी, समावेशी आणि स्वागतशील वातावरण उपलब्ध करुन देण्यासाठी काय करता येईल ?

(1) विद्यार्थ्यांच्या उत्तम आरोग्यावर आणि खुशालीवर भर देणे

(2) वेगवेगळ्या क्षेत्रातील विकास अवस्थेसंबंधीचे मुलांचे कार्य प्रदर्शित करणे

(3) रंगबेरंगी वातावरण निर्माण करण्यासाठी वर्ग सजवणे

(4) कडक ऊन असताना बाहेरचे उपक्रम न घेता परिसरातील उपक्रम करुन घेणे

**120.** साक्षरता आत्मसात करण्यासाठी पुढील कोणते कौशल्य आत्मसात केले पाहिजे ?

(1) शब्दसंग्रह पाहणे आणि रचना ओळखणे

(2) भाषा आकलन आणि डिकोडिंग (Decoding)

(3) अचूकता आणि स्वनिमिक आकलन

(4) स्वनिमिक जागरुकता आणि ओघ

prepp
Your Personal Exams Guide

परीक्षार्थींनी **भाषा–II** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग–V** मधील ( **प्रश्न क्र. 121** ते **150** ) यांची उत्तरे द्यावीत.

Candidates should attempt the questions from **Part-V (Q.No. 121-150)**, if they have opted **MARATHI** as **Language-II** only.

Prepp
Your Personal Exams Guide

## भाग–V

## भाषा–II

## मराठी

**महत्त्वपूर्ण :** परीक्षार्थींनी भाषा – **II** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग – V** मधील **( प्रश्न क्र. 121 ते 150 )** यांची उत्तरे द्यावीत.

**सूचना : पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक 121 ते 128 यासाठी योग्य पर्यायाची निवड करा.**

सईताई आणि अप्पा ह्यांच्याबद्दलच्या माझ्या सुरुवातीच्या भावना हळूहळू बदलत गेल्या. मी मोठी होत होते, माझी समज वाढत होती, हे जसे त्याचे एक कारण, तसेच त्या दोघांचा स्वभाव हेही दुसरे कारण. सईताई सुरेख होत्या, प्रेमळ होत्या, त्यांना काव्याची गोडी होती, पण त्यांचे मन लहान मुलाचे, अविकसित असे राहिले. संसारातील अनुभवांनी त्यात जी खोली यायची, ती आलीच नाही. इतकेच नाही, तर मानसिक विकृतीला बळी पडून त्यांची सगळीच मानसिक वाढ एक प्रकारे खुंटली होती. शकू त्यांची पहिली मुलगी. तिच्या पाठोपाठच दीड वर्षात त्यांना मुलगा झाला आणि तो वर्षाच्या आतच गेलाही. त्या दु:खाने त्यांच्या मनावर काही विलक्षण परिणाम झाला असला पाहिजे. माझ्या लहानपणी मला ह्या गोष्टी कळत नसत, पण आता मात्र त्यांची संगती लागते. आपल्याभोवती कोणी तरी लहान मूल असल्याखेरीच त्यांना जेवणच जात नसे. आम्ही सगळी मुले जेवून शाळेत गेलो, म्हणजे त्या शेजारच्या लिमयांच्या घरची मुलं तरी आणीत, नाही तर गुण्यांच्या मधूला तरी घेऊन येत व आपल्या समोर बसवून जेवत. सईताईंच्या बरोबर बाजारात जायला मोठी गंमत असे. त्या नेहमी मला आणि शकूला काही तरी खाण्याची, खेळण्याची किंवा लेण्याची वस्तू घेऊन देत. स्वत: इतके जिन्नस खरेदी करीत की, त्यांची मागाहून येणारी बिले भागवता–भागवता बिचाऱ्या अप्पांच्या अगदी नाकी नऊ येत. त्यांना खेळायच्या वस्तू विकत घ्यायचा फार नाद. हटकून एखादी तरी बाहुली त्या दर महिन्याला विकत आणीत असत. मी लहान असताना सर्वच गोष्टींबद्दल त्यांचे ऊतू जाणारे औत्सुक्य व आनंद एवढ्यापुरतीच ही विकृती होती. पुढे मात्र रोग फारच बळावला, तो थेट त्यांच्या मृत्यूपर्यंत. त्यांचे वर्षाचे काही महिने पहाटेपासून रात्रीपर्यंत अतिशय धांदल, समारंभ, हालचाल ह्यांत जात; व काही महिने अगदी स्वस्थ बसून, नाही जेवण, नाही खाणे, नाही आंघोळ, केवळ उदासीनता– असे जात. त्यांच्या प्रेमळपणाने मी त्यांच्याकडे आकर्षित झाले खरी, पण पुढे ह्या आकर्षणाचे रूपांतर करुणेत झाले.

**121.** एखादी तरी बाहुली त्या दर महिन्याला विकत आणीत असत. यातील 'बाहुली' हे काय आहे ?

(1) क्रियाविशेषण  (2) कर्म

(3) भाववाचक नाम  (4) सर्वनाम

**122.** 'जिन्नस' या शब्दाचा समानार्थी शब्द कोणता ?

(1) पदार्थ  (2) गणती

(3) तोफ  (4) भार

**123.** सईताई आणि अप्पा यांच्याबद्दल लेखिकेच्या भावना बदलण्याचे कारण काय ?

(1) सईताईची काव्याची आवड (2) सईताईचा सांसारिक अनुभव

(3) लेखिकेचा समजदारपणा (4) सईताईचा प्रेमळपणा

**124.** मानसिक विकृतीचे बळी कोण पडले ?

(1) शकू (2) अप्पा (3) लेखिका (4) सईताई

**125.** '<u>विलक्षण</u> परिणाम झाला' यातील अधोरेखित काय आहे ?

(1) गणनावाचक विशेषण (2) गुणविशेषण

(3) क्रमवाचक विशेषण (4) संख्याविशेषण

**126.** 'सईताई <u>सुरेख</u> व <u>प्रेमळ</u> होत्या' यातील अधोरेखित शब्द काय आहेत ?

(1) क्रियाविशेषण (2) क्रमविशेषण

(3) गुणविशेषण (4) गणनाविशेषण

**127.** दर महिन्याला बाहुली व खेळण्यातील वस्तू खरेदी करण्यामागे सईताईंची मानसिकता काय असू शकते ?

(1) पुत्रवियोग (2) खरेदीचा आनंद

(3) खेळण्याची आवड (4) खेळण्यांविषयी उत्सुकता

**128.** 'बाजार' या शब्दाच्या आशयाचा अचूक पर्याय निवडा.

(1) भाव (2) वाडा (3) भरती (4) हाट

**सूचना : पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक 129 ते 135 यासाठी योग्य पर्यायाची निवड करा.**

भाद्रपदात नुसती फुलेच नाहीत तर कोवळी फळे आणि शेंगाही झाडांवर दिसतात. फळे म्हणजे शरद ऋतूचा सुफलतेचा आविष्कार. ही पाहा डाळिंबी लालबुंद फुले आणि छोटी शोभिवंत गोल फळे तिच्यावर एकदम लहडली आहेत. तशीच ती पांढऱ्या वाटोळ्या पाकळ्यांची नाजूक केसरांनी भरलेली पेरूची सुंदर फुले व लहान हिरवी फळे. तसेच ही फिकट पिवळ्या रंगाची, नयनरम्य, उग्र वासाची पपईची फुले आणि ती लहान कठीण फळे. सीताफळीची आंबटओल्या वासाची हिरव्या चाफ्याच्या फुलांसारखी फुले आणि खवल्याखवल्यांची शोभिवंत चिमुकली फळे. शेवग्याची झाडे पांढऱ्याशुभ्र पुष्पगेंदांनी खच्चून भरली आहेत, कोवळ्या शेंगा लोंबताहेत आणि फुलांवर काळे भुंगे रुंजी घालताहेत. या फुलांवर हे भुंगे जसे लुब्ध आहेत तसे दुसऱ्या कुठल्याही आसपासच्या फुलांवर असलेले मी अजून पाहिले नाहीत. आंब्याच्या मोहोरावर वसंतकालीसुद्धा मुंबईत तरी निदान भुंगे मी कधीच पाहिले नाहीत. पण शेवगा फुलू दे की ते आलेच धावून. गुलमोहोराच्या झाडावरही हिरव्या तरवारी लटकताहेत आणि ज्याचे पान आणि पान खुडलेले असताना फुलांचा बहर आषाढात उतू जात असतो त्या पांढऱ्या खुरचाफ्याची फुले अजूनही झाडावर पर्णसंभारात गुरफटलेली रेंगाळताहेत. जणू ते या झाडाचे डोळेच असावेत. सासरी जाता जाता मागे वळून आपल्या माहेरच्या गोतावळ्याकडे वारंवार बघणाऱ्या ग्रामकन्येसारखे हे झाड आता वाटते आहे.

लाकडाची फुले! कुणी पाहिली आहेत? सुक्या फळीच्या अंतरात का कुठे फुले निर्माण करील असा ओलावा असतो? पण आजूबाजूचे सारे हिरवे हिरवे पुष्पमंडित वनस्पतींचे जग पाहून श्रावणात दगडांनी शेवाळांच्या शाली पांघरल्या आणि ही पाहा सुताराने तासलेली पाण्याच्या पिंपावर झाकण घातलेली देवदाराची फळी. किती दिवसांत ऊन नाही. वातावरण कसे सर्द आणि कुंद झाले होते. श्रावणभर ओलाव्यात राहून हिच्यावर बुरशीसारखे पांढरे डाग आले; मग त्यांचे मोहरीएवढे पांढरे कळकट दाणे झाले. मी ती फळी धुणार, तो काय चमत्कार! त्या मोहरीच्या दाण्यातून एक अतिसुंदर पाकळी पांढऱ्या तपकिरी मखमलीसारखी दिसू लागली. माझे मन मोहित झाले. वाटले की पावसाळी भूछत्रांसारखे काहीतरी उगवत असेल. बुरशीचीच मौज काही दिवस पाहावी म्हणून ती फळी मी तशीच ठेवली.

**129.** कशाच्या फुलांवर काळे भुंगे रुंजी घालताहेत?

(1) शेवगा (2) गुलमोहर

(3) खुरचाफा (4) आंबा

**130.** प्रस्तुत उताऱ्यात कोणत्या फुलांचा उल्लेख **नाही**?

(1) पपईची फुले (2) चाफ्याची फुले

(3) सीताफळाची फुले (4) पेरूची फुले

**131.** हिरव्या तरवारी लेखिकेला कशावर लटकलेल्या दिसताहेत?

(1) शेवग्याच्या झाडावर (2) आंब्याच्या झाडावर

(3) पपईच्या झाडावर (4) गुलमोहोराच्या झाडावर

**132.** 'वातावरण कसे सर्द <u>आणि</u> कुंद झाले होते' यातील अधोरेखित काय आहे ?

(1) शब्दयोगी अव्यय
(2) क्रियाविशेषण अव्यय
(3) उभयान्वयी अव्यय
(4) केवलप्रयोगी अव्यय

**133.** उग्रवास कशाचा येत असल्याचे लेखिका सांगते ?

(1) पेरूची फुले
(2) पपईची फुले
(3) शेवग्याची फुले
(4) सीताफळं

**134.** 'श्रावणभर ओलाव्यात राहून तिच्यावर बुरशीसारखे पांढरे डाग आले' यातील 'पांढरे' काय आहे ?

(1) गुणविशेषण
(2) क्रमवाचक विशेषण
(3) सार्वनामिक विशेषण
(4) पूर्णांकवाचक विशेषण

**135.** 'शोभिवंत गोल फळे तिच्यावर <u>लहडली आहेत</u>'. यातील अधोरेखित काय आहे ?

(1) विधिविशेषण
(2) शब्दयोगी अव्यय
(3) क्रियाविशेषण
(4) संयुक्त क्रियापद

**136.** पुढीलपैकी कोणत्या कृतीतून द्वितीय भाषा उत्तम प्रकारे शिकता येत ?

(1) त्या भाषेच्या मूळभाषकासोबत सतत संपर्कात राहणे.
(2) श्रव्य-भाषिक पद्धती प्रमाणे सतत संवादांचा सराव करणे.
(3) लक्ष्य भाषेच्या शिकवणी वर्गाला जाणे.
(4) अशा वर्गात जिथे तुम्हाला व्याकरणावर भर देता येते नि शिक्षकांकडून मदत मिळते.

Prepp
Your Personal Exams Guide

**137.** वाचनाची आवड निर्माण होण्यात मोठी अडचण उत्तम बालसाहित्याची उपलब्धता आणि प्रेरणा ही आहे. यातून बाहेर पडण्याचा मार्ग म्हणजे......

(1) पालकांना घरी ग्रंथालय तयार करण्यास उत्तेजन द्यावे.

(2) मुलांमध्ये आवड निर्माण होईल असे नि सहज उपलब्ध होणारे बालसाहित्य.

(3) शाळेतील अधिकाऱ्यांनी मुलांना पुस्तक मेळ्यात घेऊन जावे म्हणजे त्यांना प्रेरणा मिळेल नि आवड निर्माण होईल.

(4) शिक्षकाने गृहपाठ म्हणून रोज एक पुस्तक वाचण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करावे.

**138.** इयत्ता चवथीच्या विद्यार्थ्यांना शिक्षक तातडीने गोष्ट वाचायला आणि चार चित्र क्रमाने लावायला सांगतात. या उपक्रमाचे उद्दिष्ट ..........

(1) ढोबळपणे वाचण्याचा सराव करणे

(2) विशिष्ट माहिती मिळविण्यासाठी वाचन सराव करणे

(3) कथेतील नवीन आणि अवघड शब्दांची फेरपाहणी करणे

(4) चित्रांना जुळवणे

**139.** प्राथमिक पातळीवर वाचन कौशल्याचे मूल्यमापन करताना भाषा शिक्षकाने कोणत्या गोष्टींवर विशेष भर द्यावा ?

(1) विराम चिन्हांचा वापर

(2) योग्य वेगाने केलेले वाचन

(3) समजून केलेले वाचन

(4) बाराखडीतील अक्षर ओळख

**140.** एक चांगले संभाषण कौशल्य म्हणजे......

(1) विद्यार्थी जास्त ऐकतात

(2) विद्यार्थी जास्त बोलतात

(3) बोलघेवड्या मुलांचा अधिक सहभाग

(4) शिक्षकाने अधिक स्पष्टीकरण करणे

Prepp Your Personal Exam Guide

**141.** आधारभूत पातळीवर मूल्यमापनाचे तंत्र आणि प्रक्रिया या प्रकारे असावे की.....

(1) विद्यार्थ्यांच्या शिक्षण अनुभवाचा तो नैसर्गिक विस्तार ठरावा.

(2) वर्गातील त्याच्या सादरीकरणाचे त्यातून योग्य विवरण आणि मूल्यमापन होईल.

(3) सर्व विद्यार्थ्यांच्या प्रदर्शनाचे एकाच पद्धतीतून शिक्षकाला मूल्यमापन करता येईल.

(4) सुगम चाचण्या आणि परीक्षा मुलांच्या अनुरूप ठरतील.

**142.** छापील पुस्तकांसोबतच 'ऑडियो बुक्स' आणि अशी पुस्तके जी विद्यार्थ्याला कौशल्य उपक्रमांमध्ये गुंतवून ठेवतील वर्गात असली पाहिजे. कारण ........

(1) यामुळे शिक्षकांना मूल्यमापनासाठी वेगवेगळी पुस्तके वापरण्याचे स्वातंत्र्य मिळते.

(2) यामुळे विविध विद्यार्थ्यांना जादा पुस्तके उपलब्ध होतात.

(3) ही पुस्तके शिक्षकांना डोईजड ठरणार नाहीत.

(4) यामुळे वर्गात वैविध्यता येते आणि विद्यार्थ्यांना वैविध्यता आवडते.

**143.** "भाषा शिक्षण ही अशी एक क्रिया आहे जी जन्मापासून सुरू होते आणि जीवनभर सुरू राहते."

तुम्ही या विधानाशी सहमत आहात किंवा नाही ?

(1) विधानाशी मी सहमत नाही. (2) विधानाशी अंशत: सहमत आहे.

(3) विधानाशी अंशत: असहमत आहे. (4) विधानाशी मी सहमत आहे.

**144.** विद्यार्थी व्याकरण नियम आणि शब्दसंग्रह पाठ करतात आणि मातृभाषेत भरपूर काम करतात. शिक्षकाने कोणत्या पद्धतीचा अवलंब भाषा वर्गात केला आहे ?

(1) नैसर्गिक पद्धती (Natural approach)

(2) संज्ञापनात्मक अध्यापन

(3) व्याकरण भाषांतर

(4) थेट पद्धती (Direct Method)

**145.** विद्यार्थ्यांचा ज्ञानात्मक विकास आणि भाषा ........

(1) म्हणजे प्रत्येक माणूस भाषा आत्मसात करण्याच्या कौशल्यासह जन्माला येतो.

(2) विकासाचा काहीही संबंध नाही.

(3) याचा संस्कृती आणि समाजाशी जवळचा संबंध आहे ज्यात विद्यार्थी राहतो.

(4) याचा संबंध 'लिंकेज स्टिम्युलस-रिस्पांस' आणि अनुकरण प्रक्रिया सिद्धांताशी आहे.

Prepp
Your Personal Exams Guide

**146.** समग्र भाषा पद्धती म्हणजे __________ असते.

(1) कौशल्याधारित (2) ध्वनींचे मिश्रण

(3) प्रारूप आणि ध्वनीचा अनुमान (4) अर्थाधारित

**147.** जर मुले दोन भाषा आपल्या सभोवतालातून ऐकतात, तर या दोन भाषांचा संपर्क ........

(1) मुलांना मदतरूप ठरेल

(2) काहीही फरक पडणार नाही

(3) त्यांच्या आकलनात संदिग्धता निर्माण करेल

(4) मुलांना प्रतिकूल ठरेल

**148.** 'मुलांनी पाठ्यसामग्री काळजीपूर्वक नि लक्ष देऊन वाचावी' हे वाचन उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे. हे म्हणजे......

(1) गहन वाचन (2) निर्देशित वाचन

(3) विरंगुळा वाचन (4) विस्तृत वाचन

**149.** पाठाच्या सुरवातीला शिक्षक वर्गातील मुलांना गटात विभागून त्याने वर्तमान पत्रात वाचलेल्या एका मनोरंजक बातमीवर चर्चा करण्यास सांगतात. या प्रकारचे संभाषण उपक्रम म्हणजे .......

(1) नियंत्रित मौखिक सराव (2) निर्देशित मौखिक सराव

(3) सक्रिय श्रवण (4) मौखिक ओघ सराव

**150.** शिक्षकांनी दिलेल्या नमुना वाक्यांचा पुन:पुन्हा सराव करून विद्यार्थी भाषेचा आकृतिबंध पाठ करतात. ते ठराविक वाक्य पाठ करतात आणि ते जेव्हा त्यांचा सराव करतात तेव्हा त्यांना शिक्षकांकडून सकारात्मक प्रबलन मिळते. शिक्षक __________ याचा अवलंब करतात.

(1) संज्ञापनात्मक पद्धती (2) समग्र शारीरिक प्रतिसाद

(3) संरचनात्मक पद्धती (4) श्राव्यभाषा पद्धती

- o O o -

www.prepp.in

SPACE FOR ROUGH WORK

**खालील सूचना काळजीपूर्वक वाचा :**

1. वेगवेगळ्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी प्रश्न पत्रिकेत योग्य ठिकाणी सूचना देण्यात आल्या आहेत. प्रश्नांची उत्तरे देण्याअगोदर त्या सूचना काळजीपूर्वक वाचा.

2. प्रत्येक प्रश्नासाठी दिलेल्या चार पर्यायांपैकी बरोबर उत्तरासाठी OMR उत्तरपत्रिकेच्या **बाजू-2** वर केवळ एकच वर्तुळ **निळ्या किंवा काळ्या बॉल पॉइन्ट पेन** ने संपूर्ण निळे/काळे भरा. एकदा उत्तराचे वर्तुळ भरल्यावर ते बदलता येणार नाही.

3. परीक्षार्थींनी उत्तर पत्रिकेला कोठेही घडी पडणार नाही किंवा त्यावर कुठलीही असंबद्ध खूण केली जाणार नाही याची काळजी घ्यावी. परीक्षार्थींनी आपला अनुक्रमांक उत्तर पत्रिकेत नेमून दिलेल्या जागेव्यतिरिक्त अन्यत्र लिहू नये.

4. चाचणी-पुस्तिका आणि उत्तरपत्रिका काळजीपूर्वक हाताळा. कारण कोणत्याही परिस्थितीत (चाचणी-पुस्तिकेचा कोड अथवा क्रमांक आणि उत्तरपत्रिकेचा कोड अथवा क्रमांक यांमधील विसंगती वगळता) दुसरा संच पुरविला जाणार नाही.

5. चाचणी-पुस्तिका/उत्तरपत्रिका यांवर दिलेला कोड आणि क्रमांक परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर बरोबर लिहावा.

6. OMR उत्तरपत्रिकेतील माहितीचे वाचन संगणकाच्या मदतीने केले जाते. त्यामुळे कोणतीही माहिती अपुरी किंवा प्रवेश पत्रकातील माहितीपेक्षा वेगळी देऊ नये.

7. परीक्षार्थींना कोणतीही पाठ्यपुस्तकाची सामग्री, मुद्रित अथवा लिखित, कागदाचे तुकडे, पेजर, मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण अथवा प्रवेशपत्रिकाव्यतिरिक्त अन्य कोणतीही सामग्री परीक्षेच्या सभागृहात/खोलीमध्ये आणण्याची परवानगी नाही.

8. मोबाईल फोन, तार रहित संभाषण यंत्र, (बंद केलेल्या अवस्थेतही) किंवा इतर निषिद्ध वस्तू परीक्षाकेन्द्रात आणू नये. तसे केल्याचे आढळल्यास त्याला 'अनफेअर मीन्स' गृहीत धरले जाईल आणि त्यावर परीक्षा निरस्त करणे या सकट इतर कार्यवाही करण्यात येईल.

9. प्रत्येक परीक्षार्थीने त्याची/तिची प्रवेश-पत्रिका पर्यवेक्षकांनी मागितल्यावर त्यांना दाखवली पाहिजे.

10. पर्यवेक्षक अथवा अधीक्षक यांच्या खास परवानगीशिवाय कोणत्याही परीक्षार्थीला आपली जागा सोडता येणार नाही.

11. कामावर असलेल्या पर्यवेक्षकांकडे उत्तरपत्रिका दिल्याखेरीज आणि उपस्थिती पृष्ठावर दोनदा सही केल्या खेरीज परीक्षार्थींनी परीक्षागृह सोडू नये. ज्या परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर दुसऱ्यांदा सही केलेली नसेल त्यांची उत्तर पत्रिका पर्यवेक्षकाकडे दिली गेलेली नाही, असे समजले जाईल आणि ती बाब अनुचित साधनाची बाब मानली जाईल. परीक्षार्थींनी आपल्या डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा उपस्थिती पृष्ठावर दिलेल्या ठिकाणी करावा.

12. इलेक्ट्रॉनिक/हस्तसंचालित गणितयंत्रा (Calculator) चा उपयोग निषिद्ध आहे.

13. परीक्षागृहातील वर्तणुकीबाबत परीक्षार्थींना बोर्डाच्या नियमांचे पालन करावे लागेल. अनुचित साधनाच्या सर्व बाबींचा निर्णय बोर्डाच्या नियमांनुसार केला जाईल.

14. चाचणी-पुस्तिका अथवा उत्तरपत्रिका यांचा कोणताही भाग कोणत्याही परिस्थितीत सुटा करू नये.

15. **चाचणी पूर्ण झाल्यानंतर परीक्षार्थींनी उत्तरपत्रिका परीक्षागृहातील पर्यवेक्षकाकडे दिली पाहिजे. चाचणी-पुस्तिका परीक्षार्थी आपल्याबरोबर घेऊन जाऊ शकतात.**

## निम्नलिखित निर्देशों को ध्यान से पढ़ें :

1. जिस प्रकार से विभिन्न प्रश्नों के उत्तर दिए जाने हैं उसका वर्णन परीक्षा पुस्तिका में किया गया है, जिसे आप प्रश्नों का उत्तर देने से पहले ध्यान से पढ़ लें।
2. प्रत्येक प्रश्न के लिए दिए गए चार विकल्पों में से सही उत्तर के लिए OMR उत्तर पत्र के **पृष्ठ-2** पर केवल एक वृत्त को ही पूरी तरह **नीले/काले बॉल पॉइन्ट पेन** से भरें। एक बार उत्तर अंकित करने के बाद उसे बदला नहीं जा सकता है।
3. परीक्षार्थी सुनिश्चित करें कि इस उत्तर पत्र को मोड़ा न जाए एवं उस पर कोई अन्य निशान न लगाएँ। परीक्षार्थी अपना अनुक्रमांक उत्तर-पत्र में निर्धारित स्थान के अतिरिक्त अन्यत्र न लिखें।
4. परीक्षा पुस्तिका एवं उत्तर पत्र का ध्यानपूर्वक प्रयोग करें, क्योंकि किसी भी परिस्थिति में (केवल परीक्षा पुस्तिका एवं उत्तर पत्र के कोड या संख्या में भिन्नता की स्थिति को छोड़कर) दूसरी परीक्षा पुस्तिका उपलब्ध नहीं करायी जाएगी।
5. परीक्षा पुस्तिका/उत्तर पत्र में दिए गए परीक्षा पुस्तिका कोड व संख्या को परीक्षार्थी सही तरीके से उपस्थिति-पत्र में लिखें।
6. OMR उत्तर पत्र में कोडित जानकारी को एक मशीन पढ़ेगी। इसलिए कोई भी सूचना अधूरी न छोड़ें और यह प्रवेश-पत्र में दी गई सूचना से भिन्न नहीं होनी चाहिए।
7. परीक्षार्थी द्वारा परीक्षा हॉल/कक्ष में प्रवेश-पत्र के सिवाय किसी प्रकार की पाठ्य-सामग्री, मुद्रित या हस्तलिखित, कागज़ की पर्चियाँ, पेजर, मोबाइल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण या किसी अन्य प्रकार की सामग्री को ले जाने या उपयोग करने की अनुमति नहीं है।
8. मोबाइल फोन, बेतार संचार युक्तियाँ (स्विच ऑफ अवस्था में भी) और अन्य प्रतिबंधित वस्तुएँ परीक्षा हॉल/कक्ष में नहीं लाई जानी चाहिए। इस सूचना का पालन न होने पर इसे परीक्षा में अनुचित साधनों का प्रयोग माना जाएगा और परीक्षार्थी विरुद्ध कार्यवाही की जाएगी, परीक्षा रद्द करने सहित।
9. पूछे जाने पर प्रत्येक परीक्षार्थी, निरीक्षक को अपना प्रवेश-पत्र दिखाएँ।
10. केन्द्र अधीक्षक या निरीक्षक की विशेष अनुमति के बिना कोई परीक्षार्थी अपना स्थान न छोड़ें।
11. कार्यरत निरीक्षक को अपना उत्तर पत्र दिए बिना एवं उपस्थिति-पत्र पर दुबारा हस्ताक्षर किए बिना परीक्षार्थी परीक्षा हॉल/कक्ष नहीं छोड़ेंगे। यदि किसी परीक्षार्थी ने दूसरी बार उपस्थिति-पत्र पर हस्ताक्षर नहीं किए, तो यह माना जाएगा कि उसने उत्तर पत्र नहीं लौटाया है और यह अनुचित साधन का मामला माना जाएगा। **परीक्षार्थी अपने बाएँ हाथ के अंगूठे का निशान उपस्थिति-पत्र में दिए गए स्थान पर अवश्य लगाएँ।**
12. इलेक्ट्रॉनिक/हस्तचालित परिकलक का उपयोग वर्जित है।
13. परीक्षा हॉल/कक्ष में आचरण के लिए परीक्षार्थी परीक्षण संस्था के सभी नियमों एवं विनियमों द्वारा नियमित हैं। अनुचित साधनों के सभी मामलों का फैसला परीक्षण संस्था के नियमों एवं विनियमों के अनुसार होगा।
14. किसी भी परिस्थिति में परीक्षा पुस्तिका और उत्तर पत्र का कोई भाग अलग न करें।
15. **परीक्षा सम्पन्न होने पर, परीक्षार्थी हॉल/कक्ष छोड़ने से पूर्व उत्तर पत्र निरीक्षक को अवश्य सौंप दें।** ***परीक्षार्थी अपने साथ इस परीक्षा पुस्तिका को ले जा सकते हैं।***

## READ THE FOLLOWING INSTRUCTIONS CAREFULLY :

1. The manner in which the different questions are to be answered has been explained in the Test Booklet which you should read carefully before actually answering the questions.
2. Out of the four alternatives for each question, only one circle for the correct answer is to be darkened completely with **Blue / Black Ball Point Pen** on **Side-2** of the OMR Answer Sheet. The answer once marked is not liable to be changed.
3. The candidates should ensure that the Answer Sheet is not folded. Do not make any stray marks on the Answer Sheet. Do not write your Roll No. anywhere else except in the specified space in the Answer Sheet.
4. Handle the Test Booklet and Answer Sheet with care, as under no circumstances (except for discrepancy in Test Booklet Code or Number and Answer Sheet Code or Number), another set will be provided.
5. The candidates will write the correct Test Booklet Code and Number as given in the Test Booklet/Answer Sheet in the Attendance Sheet.
6. A machine will read the coded information in the OMR Answer Sheet. Hence, no information should be left incomplete and it should not be different from the information given in the Admit Card.
7. Candidates are not allowed to carry any textual material, printed or written, bits of papers, pager, mobile phone, electronic device or any other material except the Admit Card inside the examination hall/room.
8. Mobile phones, wireless communication devices (even in switched off mode) and the other banned items should not be brought in the examination halls/rooms. Failing to comply with this instruction, it will be considered as using unfair means in the examination and action will be taken against the candidate including cancellation of examination.
9. Each candidate must show on demand his/her Admit Card to the Invigilator.
10. No candidate, without special permission of the Centre Superintendent or Invigilator, should leave his/her seat.
11. The candidates should not leave the Examination Hall/Room without handing over their Answer Sheet to the Invigilator on duty and sign the Attendance Sheet twice. Cases where candidate has not signed the Attendance Sheet second time will be deemed not to have handed over the Answer Sheet and dealt with as an unfair means case. **The candidates are also required to put their left hand THUMB impression in the space provided in the Attendance Sheet.**
12. Use of Electronic/Manual Calculator is prohibited.
13. The candidates are governed by all Rules and Regulations of the Examining Body with regard to their conduct in the Examination Hall/Room. All cases of unfair means will be dealt with as per Rules and Regulations of the Examining Body.
14. No part of the Test Booklet and Answer Sheet shall be detached under any circumstances.
15. **On completion of the test, the candidate must hand over the Answer Sheet to the Invigilator in the Hall / Room.** ***The candidates are allowed to take away this Test Booklet with them.***